Vol-13 Special Issue- 1.3 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# विकसित भारत 2047 च्या अनुषंगाने आजच्या अध्ययन-अध्यापन पध्दतीत वसुधैव कुटूंबकम् च्या समस्यांचे एकत्रिकरण

**प्रा.प्रियंका वे. इंगोले**
स्व. शिवरामजी हिवसे अध्यापक महाविद्यालय, वरूड

"अयं निज : परो वेति गणना लघूचेतसाम् | उदारचरितानां तु वसुधैव कुटूंबकम्"

याचा अर्थ असा की, हे माझे आहे आणि ते दुसऱ्याचे आहे असा विचार संकुचित मनाचे लोक करतात. परंतु उदार मनाच्या लोकांसाठी संपूर्ण पृथ्वी हेच एक कुटूंब असते. भारताच्या याच महान विचाराच्या संस्कृतीने जगाला शांती आणि मानवतेचा संदेश दिला आहे. आजचे युग हे विज्ञानाचे आणि तंत्रज्ञानाचे आहे. जग 'ग्लोबल व्हिलेज' झाले आहे पण माणसांची मने मात्र दुरावत चालली आहे. अशावैळी वसुधैव कुटुंबकम् हा विचार अत्यंत महत्वाचा ठरतो. विकसीत भारत 2047 च्या संकल्पनेत सर्वांगीण, सर्वसमावेशक आणि आजीवन शिक्षणावर आधारित अशा सशक्त व्यवस्थेला स्विकारले आहे. जी विद्यार्थ्यांना ज्ञान, कौशल्य, नैतिकमूल्ये आणि भावनिक बुध्दीमत्ता देऊन जागतिक स्तरावर सक्षम बनवते. यात डिजिटल आणि प्रत्यक्ष शिक्षणाचे एकत्रीकरण, शिक्षकांचे सक्षमीकरण अभ्यासक्रमात बदल आणि शिक्षणाची संस्कृती रुजवणे यावर भर आहे त्यासाठी 'संपूर्ण जग एक कुटूंब आहे' या विचाराला सक्षम बनविण्याची गरज आहे. हा विचार सर्वसमावेशक शिक्षणातून विद्यार्थ्यांना जागतिक नागरिक बनवण्यास आणि शांतता व सहकार्याला प्रोत्साहन देऊन जबाबदार आणि एकात्मिक जागतिक समाजाचा भाग बणण्यास प्रवृत्त करते. ही संकल्पना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (NEP2020) मध्येही समाविष्ट आहे जी विद्यार्थ्यांना एकात्मिक जागतिक समाजासाठी तयार करते.

## वसुधैव कुटूंबकम् संकल्पनेचे शैक्षणिक पैलू -

एकता व एकात्मता- सर्व मानव आणि सजिव एकच आहे आणि प्रत्येकाला एकमेकांच्या सहकार्याची गरज आहे यासाठी एकता आणि एकात्मता शिक्षणातुन रुजविणे.

सर्वसमावेशकता – भाषिक आणि सांस्कृतिक विविधता असूनही सर्वांना समान संधी देणे हे तत्व सर्वसमावेशकता दर्शविते.

नैतिक शिक्षण – करुणा,संहिष्णूता,जबाबदारीची जाणीव, सहकार्य आणि प्रामाणिकपणा यातून नैतिक विकास साधला जातो.

जागतिक नागरिकत्वाची तयारी – विद्यार्थ्यांना स्थानिक आणि जागतिक स्तरावर निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाय शोधण्यास आणि त्यानुसार सकारात्मक बदल घडवण्यास सक्षम करणे म्हणजे जागतिक नागरिकत्वाची तयारी होय.

पर्यावरणाविषयी जागरुकता-पर्यावरणपुरक कार्य करणे आणि जबाबदार निर्णय घेण्यास शिकविणे म्हणजेच जागृकता होय.

सहकार्य आणि मदत- आपण रंगाने, धर्माने आणि भाषेने वेगळे असून पण सर्वांचे रक्त मात्र माणूस म्हणून एकच आहे. हा विचार रुजविणे त्यासाठी सहकार्य व मदतीचा हात सदैव समोर ठेवणे. जसा कोविड-19 च्या काळात भारताने संपूर्ण जगाला लसीचा पुरवठा करुन वसुधैव कुटुंबकम् हा विचार कृतीत उतरवून दाखवला.

संघर्ष निवारण - युध्द आणि व्देषाच्या वातावरणात हा विचार आपल्याला शस्त्राऐवजी प्रेमाची व शांततेची भाषा शिकविते.

अशा सर्व वसुधैव कुटुंबकम् संकल्पनेच्या शैक्षणिक पैलुंना विद्यार्थ्यांमध्ये अध्ययन-अध्यापन प्रक्रियेव्दारे रुजवून विकसित भारत 2047 चे स्वप्न पूर्ण करायचे असेल तर सर्वप्रथम अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये या संकल्पनेशी संबंधीत निर्माण होणाऱ्या समस्या जाणून घेणे गरजेचे आहे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

परिक्षार्थी दृष्टीकोण - सध्याची शिक्षण पध्दती ही प्रामुख्याने गुण, श्रेणी आणि स्पर्धात्मक परिक्षांवर केंद्रीत आहे. यामुळे मानवता किंवा जागतिक बंधूभाव यासारख्या मुल्यांपेक्षा अभ्यासक्रम पूर्ण करणे याला अधिक प्राधान्य दिले जाते.

अभ्यास आणि पाठांतर – विषयाशी संबंधित संकल्पनात्मक समज आणि मुल्यसंस्काराऐवजी माहीतीच्या तात्पूरत्या अभ्यासावर किंवा पाठांतरावर भर दिल्यामुळे वैश्विक एकात्मतेचा विचार पुस्तकांपुरता किंवा परिक्षेपूरता मर्यादित राहतो.

सांस्कृतिक आणि भाषिंक अडथळे – वर्गामध्ये वेगवेगळ्या संस्कृती आणि भाषेला स्विकारणारे विद्यार्थी असतात. अशावेळी सर्वांना 'एक कुटुंब' म्हणून जोडणारे सर्वसमावेशक अध्यापन साहित्य तयार करणे शिक्षकांसाठी कठीण जाते.

पाश्चात्य आणि भारतीय विचार- आधुनिक शिक्षण पध्दतीवर पाश्चात्य विचारसरणीचा मोठा पगडा आहे जी बऱ्याचदा व्यक्तीवादावर भर देते. याउलट वसुधैव कुटुंबकम् हे समुह आणि सहकार्य यावर भर देते. या दोन परस्पर विचारांचा मेळ घालणे आणि अध्यापन करणे कठीण होते.

तंत्रज्ञान आणि डिजिटल दरी – तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले आहे. तरी ज्या विद्यार्थ्यांकडे डिजीटल साधने नाहीत ते मुख्य प्रवाहातून बाहेर फेकले जातात ही आर्थीक आणि तांत्रीक दरी कुटुंब या भावनेला अध्यापनातून साकार करु शकत नाही.

सोशल मिडीयाचा प्रभाव – विद्यार्थी जागतीक नागरिक होण्याऐवजी सोशल मिडीयावरील संकुचित गटबाजी किंवा व्देषाला बळी पडतात व स्वत:पूरता विचार करायला शिकतात जे या संकल्पनेच्या पूर्णत: विरुध्द आहे.

साचेबध्द अध्यापन- अनेक शिक्षकांना अद्यापही मुल्य आधारित अध्यापन करता येत नाही. जागतिक समस्यांना स्थानिक अभ्यासक्रमाशी जोडून त्या सोडविण्याबाबत मार्गदर्शन करतांना ते मागे पडतात आणि ठरवून दिलेले साचेबध्द अध्यापन पूर्ण करतात.

वाढती स्पर्धा आणि व्यावसायिकता- आजचे शिक्षण हे करिअर आणि पॅकेज केंद्रित झाले आहे. दुसऱ्याला मदत करण्यापेक्षा स्पर्धेत मी पुढे कसा जाईल हा विचार असतो. त्यामुळे अध्यापनातून सहकार्य या कौटुंबीक भावनेचा ऱ्हास होत आहे.

वरील सर्व अध्ययन-अध्यापन संबंधीत संमस्यांचे एकत्रीकरण केले असता लक्षात येते की वसुधैव कुटुंबकम् हा विचार विकसीत भारत 2047 च्या संकल्पनेला शिक्षणातून साकार करु शकत नाही, यावर मात करण्यासाठी विविध उपाय आणि बदल करुन ते अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षकाने खालील प्रक्रिया राबवावी.

विद्यार्थ्यांमध्ये 'मी जगाचा एक भाग आहे' ही जाणीव निर्माण करणे.

विविध संस्कृती, भाषा आणि धर्मांबद्दल आदर निर्माण करणे.

अध्यापनात जागतिक समस्यांकडे कौटुंबीक समस्या म्हणून पाहण्याची दृष्टी देणे.

मुल्य ही केवळ तासिकेपूरती नाही तर ती विचारात रुजविण्याचा प्रयत्न करावा.

इतिहास, भूगोल यासारख्या विषयांतून देश-देशांतील संस्कृती आणि भौगोलीक बदल शोधण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करावे.

भाषा विषयाच्या माध्यमातून वेगवेगळ्या भाषांमधील साहित्याचा परिचय करुन द्यावा.

तंत्रज्ञानाचा वापर करुन दुसऱ्या देशातील विद्यार्थ्यांसोबत संवाद साधण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी.

विद्यार्थ्यांचे केवळ लेखी परिक्षेवरुन मुल्यमापन न करता अनुभवजन्य शिक्षण देऊन त्यांच्यातील बदल तपासून मुल्यमापन करावे. जेव्हा एखादा शिक्षक वर्गात शिकवतांना 'हे विश्वची माझे घर' या ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे वर्गात वातावरण निर्माण करतो, जगाला बदलण्यापूवी आपला दृष्टीकोन बदलतो, पहीले स्वत: 'वसुधैव कुटुंबकम्' चा स्विकार करतो आणि मग तो विद्यार्थ्यांमध्ये रुजवतो तेव्हा खऱ्या अर्थाने अध्यापन यशस्वी होते.

## निष्कर्ष :-

विकसीत भारत 2047 साठी वसुधैव कुटुंबकम् या संकल्पनेला शिक्षण प्रक्रियेत सहभागी केल्यास शिक्षणातून भारत एक विकसित राष्ट्र बनुन जगाला एक कुटुंब समजून सर्वांच्या प्रगतीत योगदान देईल. जागतिक शांतता, समृध्दी आणि शाश्वत

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

विकासासाठी वसुधैव कुटुंबकम् या तत्वाचा आधार घेऊन भारताची प्रगती होईल. अर्थात 'विकसीत भारत 2047' हे एक ध्येय आहे आणि वसुधैव कुटुंबकम्' हे त्या ध्येयाला दिशा देणारे वैश्विक तत्व आहे जे शिक्षणातून आणि दैनंदिन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतून साकार करायचे आहे.

## संदर्भ

कुलकर्णी एस.आर. : उच्च शिक्षणातील समकालीन प्रवाह, मुंबई, हिमालय प्रकाशन

निती आयोग विकसीत भारत@2047 : दृष्टीकोन दस्ताऐवज, भारत सरकार, नवी दिल्ली

टिळक जे.बी.जी. भारतामधील शिक्षण व विकास, ज्ञान पब्लिशिंग हाऊस

भारत सरकार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली, UGC, Higher Education in India issues. Challenges and Reforms, नवी दिल्ली

लवकुशसिंह, वसुधैव कुटुंबकम्, न्यु दिल्ली पब्लिकेशन

विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) भारतीय उच्च शिक्षण : समस्या व सुधारणा, नवी दिल्ली

S.P. Pande, Vaisudhaiv Kutumbkam, The Power of Desi Roots., New Delhi Publication.

Teacher's Welfare is Nation's Welfare
CTEF
Council for Teacher Education Foundation
ESTD. 1985